| | | |
|---|---|---|
| MHKO050024892025 | कौटुंबिक हिंसाचार अर्ज क्र. ६०/२०२५ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश | उमा खोत<br>वि.<br>गणेश खोत व इतर |

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अंतर्गत दाखल केलेल्या मूळ प्रकरणामध्ये अर्जदार अंतरिम पोटगी मागत आहे. (येथुन पुढे सोयीकरीता “सदर कायदा” असे संबोधले आहे). अर्जदार अंतरिम पोटगीशिवाय राहणेसाठी घरभाडे, संरक्षण आदेश इ. मागण्या केल्या आहेत. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी अंतरिम पोटगी व्यतिरिक्त मागितलेल्या मागण्या या प्रकरणामध्ये दोन्ही बाजूचा पुरावा घेतल्यावर गुणदोषावर निर्गमित करण्यात येतील. प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगी करता विचारात घेण्यात आला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

२. अर्जदार व वि.प. नं.१ हे पती पत्नी असुन त्यांचा प्रेम विवाह त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे रितीरिवाजानुसार व परंपरेनुसार दिनांक ०१/१२/२०१० रोजी कबनूर, इचलकरंजी येथे झाला. लग्नसंबंधातून त्यांना अर्जदार नं.२ ही त्रिशा ही मुलगी दि.२८/१०/२०२२ रोजी झाला आहे. लग्नानंतर सुरवातीचे २ ते ३ महिने वि.प. यांनी अर्जदारास व्यवस्थीत नांदवले. त्यानंतर तुला घरचे काम जमत नाही, तु आम्हाला पसंद नाहीस, तुमचे वडीलांनी लग्नामध्ये पाहुणचार केला नाही, हुंडा दिला नाही असे म्हणून वारंवार अर्जदार हिस त्रास देत होते. वि.प.नं.१ हे त्यांच्या आईचे ऐकून कोणतीही शहानिशा न करता अर्जदार नं.१ यांना शिवीगाळ करून, गलिच्छ आरोपी करून भांडणतंटा करीत असत. वि.प.नं.३ या अर्जदार नं.१ च्या नणंद असून वि.प.नं.२ व ३ यांचे कान भरून अर्जदार यांच्या संसारामध्ये ढवळाढवळ करत असते. अर्जदार नं.१ ही गरोदर असताना देखील वि.प.

तिला वारंवार काम लावत असत. तसेच पहिल्या महिन्यापासून आम्हाला मुलगाच पाहिजे, मुलगी झाली तर परत घरी येवू नकोस असे धमकविण्यास सुरू केले. अर्जदार नं.१ यांच्या वडीलांनी लग्नामध्ये पाहुणचार केला नाही, मानपान केला नाही असे सतत म्हणत असल्यामुळे अर्जदार नं.१ यांच्या वडीलांनी अर्जदारास २ अंगठया, पायातले व वि.प.नं.१ यास अंगठी असे दागदागिने दिले व त्यावेळी अर्जदार व वि.प.नं.१ यांना व्यवस्थीत संसार करा असे सांगून देखील वि.प. यांच्यामध्ये काहीही बदल झाला नाही. तसेच वि.प. यांनी तुमचे आईवडील आम्हास समजावून सांगणारे कोण असे म्हून वि.प.नी अर्जदार नं.१ यांना नेसत्या कपडयानिशी तीन महिनेची गरोदर असताना घरातून हाकलून दिले. तेव्हा पासून अर्जदार नं.१ ही तिच्या माहेरी राहत आहे.

३. अर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, दि.२८/१०/२०२२ रोजी अर्जदार नं.१ यांनी अर्जदार नं.२ हिस जन्म दिला. सदर वेळच्या हॉस्पीटलचा संपुर्ण खर्च हा अर्जदार यांच्या आईवडीलांनी केला. वि.प.नं.१ यास फोनकरून वारंवार बाळास भेटणेस या असे वारंवार सांगावे लागत होते. तसेच वि.प.नं.१ हे भेटणेस आले तरी काहीतरी विचित्र बोलणे, संशयास्पद बोलून भांडणतंटा करणे, जोरजोरात बोलणे असे कृत्य करून मानसिक त्रास देत होते. दि.०४/०१/२०२३ रोजी बाळाचे बारसे करणेबाबत कळविले असता बारसे मोठयाने केलात तरच आम्ही येवू अशी धमकी वजा निरोप दिला. वि.प.नं.१ हे अर्जदार हिला ती माहेरी राहत असताना दारू पिवुन येवून मारहाण शिवीगाळ करत होते. अर्जदार यांच्या आईवडीलांनी वि.प. यांची समजूत काढून तिला नांदावयास नेण्याबाबत सांगितले असता आम्हाला मुलगा हवा होता, मुलगी झाली आहे आम्ही अर्जदार हिस नांदवणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा असे सांगितले. अशाप्रकारे वि.प. यांनी अर्जदाराचा शारीरिक व मानसिक त्रास दिला आहे.

४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वि.प. यांनी अर्जदार हिस

घरातुन हाकलुन दिल्यापासुन त्यांच्या पोटापाण्याची, कपड्यालत्याची, औषधपाण्याची कसलीही व्यवस्था केली नाही. त्यामुळे, अर्जदार नं.१ ही तिचा स्वतःचा व तिच्या मुलाचा उदरनिर्वाह भागविण्यास असमर्थ आहे. तसेच, अर्जदार हिस उत्पन्नाचे कसलेही साधन नाही. वि.प. नं.१ हा बालाजी प्रोसेसवर सुपरवायझार म्हणून नोकरीस असून त्यास प्रतिमहिना रू.४०,०००/- ते ४५,०००/- पगउत्पन्न मिळते. वि.प.नं.१ याचे स्वत:चे घर आहे. वि.प.नं.१ वर वि.प.नं.२ व ते ३ हे अवलंबून नाहीत. वि.प.नं.१वर अर्जदारशिवाय कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे अर्जदाराना प्रत्येकी रू.२० हजार देण्याची ऐपत वि.प. यांची आहे. त्यामुळे, अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेच्या तारखेपासुन दरमहा रक्कम रू.२०,०००/- प्रमाणे तात्पुरती स्वरुपाची पोटगी वि.प. यांचेकडुन मिळावी, अशी विनंती केली आहे.

५. वि.प. वकिल देवून हजर झाले. त्यांनी नि.१३ कडे आपले म्हणणे देवून अर्जातील कथने खोटी असल्याचे सांगितले आहे. वि.प. यांनी असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार ही लग्नानंतर वारंवार माहेरी जाणे पसंद करत होती. वि.प.नं.१ हे आयशर गाडीवर बदली कामगार क्लीनर म्हणून काम करत होते हे अर्जदार नं.१ यांना पसंत नव्हते. अर्जदार या वि.प.यांचे घरी असलेल्या रितीरिवाजांना कधीही मानत नव्हत्या. माहेरील लोकांशी सतत फोनवर बोलत असत. अर्जदार या वि.प. यांच्याशी उध्दटपणे बोलून वारंवार भांडणतंटा करीत होती. दि.२०/०६/२०२१ रोजी माहेरी गेल्यानंतर त्यांनी वि.प.नं.१ यांना कधीही फोन केला नाही. दि.२५/०६/२०२१ रोजी वि.प.नं.१ व त्यांचे घरचे लोक अर्जदार हिच्या घरी गेले असता अरेरावीची भाषा करून त्यांचा अपमान केला. तरी देखील वि.प. यांनी अर्जदार नं.१ यांना सासरी पाठविण्याची विनंती केली असता बैठक घेवून अर्जदार व वि.प.नं.१ यांनी वेगळे रहावे असा हट्ट धरला. अखेर सप्टेंबर २०२१ मध्ये अर्जदार व त्यांच्या आई यांचे अटीप्रमाणे अर्जदार व वि.प.नं.१ हे जवाहरनगर, इचलकरंजी येथे स्वतंत्र राहू लागले.

६. वि.प.यांचे पुढे असे म्हणणे आहे की, वि.प.यांची स्वतंत्र राहून घरखर्च चालविण्याची कुवत नसलेने व अर्जदाराची घरची परिस्थिती चांगली असलेने अर्जदाराचे वडील वि.प.क्र.१ यास घरभाडे वइतर खर्चाकरिता दरमहा रू.६,०००/- देत असत. तिथे सर्वसाधारण ६ महिने राहिलेनंतर अर्जदार गरोदर राहिली व ती तिच्या माहेरी गेली. त्यानंतर दि.२८/१०/२०२२ रोजी त्रिशा नावाची मुलगी जन्मास आली. अर्जदार हिचे बाळंतपणाचा व दवाखान्याचा संपूर्ण खर्च व बारसे हे वि.प. यांचे घरच्यांनी केले आहे. अर्जदार यांना वि.प. यांच्या घरच्यांनी अनेकवेळा समजावून नांदण्यास येणेबाबत कळविले असता तिने प्रतिसाद दिला नाही. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार वि.प. यांनी स्वतंत्र राहणेस तयार असलेचे सांगितले परतु दि.०९/१२/२०२४ रोजी अर्जदार हिने वि.प. यांचे व्हॉटस ॲपवर वकिलांमार्फत खोटया आशयाची नोटीस पाठविली.

७. वि.प.यांचे पुढे असे म्हणणे आहे की, वि.प. हे बालाजी ट्रान्सपोर्ट येथे बदली कामगार म्हणून नोकरीस असून त्यांना रू.४,०००/- इतका दरमहा पगार आहे. अर्जदार व त्रिशा यांना दवाखान्याचा खर्च म्हणून रोख रू.१५००/- मार्च २०२३ पासून त्यांच्या सासूकडे देत आहेत. याऊलट अर्जदार या धन्वंतरी हॉस्पीटल, गांवभाग, इचलकरंजी येथे नर्स म्हणून नोकरीस असून त्यांना दरमहा रू.१२,०००/- इतका पगार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेची विनंती केली राजी.

८. अर्जदारचे वकील व वि.प. यांचे वकीलांचा युक्तिवाद विचारात घेतला त्यानुसार अंतरिम अर्जाच्या दृष्टीने खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचे सकारण निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास कोणाला व किती? | : | अंशतः होकारार्थी. अर्जदार नं.१ हिस रु.३०००/- दरमहा व |

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| | | | अर्जदार नं.२ हिस रू.१०००/- दरमहा. |
| २. | काय आदेश? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ व २ बाबत -

९. सदर कायद्यातील तरतुदीनुसार शपथपत्रावर आधारुन अर्जदार अंतरिम दाद मागू शकते. वि.प.विरुद्ध अनेक कथने तिने सदर अर्जात आणि त्याच्या पृष्ठ्यर्थ दाखल केलेल्या शपथपत्रात केली आहेत. अनुक्रमे निशाणी क्र.१० व १७ लगतचे अर्जदार व वि.प. यांच्या सर्वोच्च न्यायालयाचे रजनेश वि. नेहा या न्यायनिवाडाप्राणे ऐपतिचे शपथपत्र दाखल आहेत. अर्जदाराने शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे मारहाण करुन घरातून हाकलून दिल्याने अर्जदार माहेरी राहते. वि.प.च्या त्रासामुळे अर्जदार ही सदर कायद्यातील संज्ञेनुसार **"व्यथित व्यक्ती"** या संज्ञेत मोडते. घरगुती जुलमाबाबत तिच्या शपथपत्रातील कथने विचारात घेता वि.प.ने तिचा मानसिक छळ करुन भावनिक दुरुपयोग केल्याचे दिसते. तसेच माहेरी गेल्यानंतर तिची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुरुपयोग केला असे सकृतदर्शनी दिसते.

१०. वि.प.नं.१ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदाराला अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. अर्जदाराने ही स्वत:हून तिच्या माहेरी राहत असून अर्जदार हिने पैसे उकळण्याकरिता प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. सकृतदर्शनी अर्जदाराने त्यांची कथने शाबीत केलेली नाहीत, त्यामुळे सदर कायदयाचा दुरूपयोग अर्जदार करीत आहेत. त्यामुळे अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र नाही.

११. वि.प. याच्या लेखी म्हणणेत अर्जदार या सद्या त्यांचे सोबत रहात नाहीत ही बाब मान्य केली आहे. त्यामुळे अर्जदार माहेरी गेल्यानंतर त्यांची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुर्व्यवहार केला असे सकृतदर्शनी दिसते. वि.प.नं.१ यांचे असे म्हणणे आहे की, वि.प.नं.१ याने अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासून ते आजपर्यंत अर्जदाराला कोणतीही पोटगी रक्कम दिलेली नाही असे अभिलेखावरून दिसून येते.

१२. अर्जदार ही सध्या वि.प.नं.१ सोबत राहात नाही. तसेच अर्जदार व वि.प.नं.१ यांना त्रिशा नावाची मुलगा आहे व ती अर्जदारसोबत राहत आहे याबाबत उभयंतामध्ये वाद नाही. अंतरिम अर्जाच्या सुनावणीस अर्जदार वि.प.नं.१ सोबत राहते किंवा कसे आणि नसल्यास वि.प.ने त्यांची सोय केली अगर कसे हे पाहणे संयुक्तीक आहे. तसेच इतर आरोपांबाबत मुळ अर्जाच्या सुनावणीच्या वेळी पुराव्यावरुन निर्णीत करण्याच्या बाबींबाबत यावेळी भाष्य करणे न्यायोचित नाही. प्रस्तुत अर्जाच्या सुनावनीत दोन्ही पक्षांच्या उत्पन्नाबाबत ठोस पुरावा पाहण्याची आवश्यकता नाही. त्याबाबी प्रकरण चालल्यानंतर योग्य त्या पुराव्या आधारे निर्णीत करायचे आहे. सद्य परिस्थिती प्रकरण चालण्यात वेळ लागणार असलेने अंतरिम पोटगी सदर कायद्याच्या तरतुदी अन्वये शपथपत्र आधारुन मंजूर करता येतात.

१३. अर्जदार व वि.प.नं.१ यांच्यामधील नातेसंबंधाबाबत उभयंतामध्ये कोणताही वाद नाही. अर्जदार व वि.प. हे विभक्त राहत आहेत याबाबतही उभयंतामध्ये वाद नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वि.प. नं.१ हा वि.प. नं.१ हा बालाजी प्रोसेसवर सुपरवायझार म्हणून नोकरीस असून त्यास प्रतिमहिना रू.४०,०००/- ते ४५,०००/- उत्पन्न मिळते. वि.प.नं.१ याचे स्वत:चे घर आहे. वि.प.नं.१ वर वि.प.नं.२ व ते ३ हे अवलंबून नाहीत. परंतु सदरबाबत अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदाराने ऐपतीचे शपथपत्र नि.१० ला दाखल केले आहे. त्यामध्ये वि.प. हे बालाजी प्रोसेस, इचलकरंजी येथे सुपरवायझर म्णून नोरीस असून त्यांना

दरमहा रू.३०,०००/- पगार असल्याचे नमूद केले आहे तसेच वि.प.यांचे स्वत:चे घर असल्याचे नमूद केले आहे. परंतु त्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. वि.प.नं.१ याने त्याच्या उत्पन्न व दायित्वाच्या प्रमाणपत्रामध्ये त्यांना रू.४ हजार पगार असल्याचे, त्याला रू.५०,०००/- कर्ज असल्याचे व त्यासाठी रू.१२,००/- हप्ता असल्याचे नमूद केले आहे. वि.प.नं.१ने कर्जाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. वि.प.नं.१ च्या म्हणण्यानुसार अर्जदार ही नर्सचे काम करते. त्याबाबतही कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार हिने वि.प. यांच्या नावे मिळकत असल्याबाबतचा अथवा त्याला मिळणा-या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. वि.प.नं.१ ने अर्जदाराच्या उत्पन्नाबाबतचे कोणतेही कागदपत्रे दाखल केली नाहीत.

१४. अर्जदार जरी अर्थार्जन करीत असली किंवा तसे करण्यास सक्षम असली तरी पती या नात्याने पत्नीची व वडील या नात्याने मुलांना सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी वि.प.नं.१ यांची आहे. त्यामुळे उभयतांचे राहणीमान आणि सद्याच्या जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती विचारात घेता अर्जदार नं.१ हीस दरमहा रुपये ३०००/- व अर्जदार नं.२ हिस दरमहा रू.१,०००/- अंतरिम पोटगी तुर्तास वि.प. नं.१ कडून मिळणे न्यायिक आहे. इतर वि.प.कडून मागणी बाबत आदेश करणेसारखी परिस्थिती तुर्तास नाही. सबब, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी देणे न्यायोचीत आहे. म्हणून मुद्दा क्र.१ मी त्यानुसार निष्कर्षित आहे. सबब आदेश-

## आदेश

१. अर्ज अंशतः खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

अ. सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दिनांक ०३/०१/२०२६ पासून वि.प.नं.१ याने अर्जदार नं.१ हिस दरमहा रू.३०००/- (अक्षरी तीन हजार रुपये मात्र) व अर्जदार नं.२ हिस दरमहा

रू.१,०००/- (अक्षरी एक हजार रुपये मात्र) सदर कायद्याचे कलम २०(ड) अन्वये अंतरिम पोटगी पुढील आदेश होईपर्यंत द्यावेत.

२. खर्चाबाबत अंतिम निर्णयावेळी आदेश करण्यात येईल.

३. सदर आदेशाच्या प्रती सदर कायद्याचे कलम २४ अन्वये संबंधीतांना विनाशुल्क देण्यात याव्यात.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.05.30 14:54:27 +0530

**(डी.बी.साठे)**

दिनांक- ३०/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इचलकरंजी.